# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०१/२०१८

**१) घरातील सोन्याचे दागीण्यांची चोरी . :—**

दिनांक ०९/०१/२०१८ चे १८.०० ते दिनांक ११/०१/२०१८ चे १२.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी घनश्याम अबिरनाथ कटारे वय ४२ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड भंडारा याची पत्नी हिने बेड रुम मधील कपाटात ठेवलेल्या बॅग मधुन १) सोन्याचे कानातील टाप्स वजन ४ ग्रॅम २) सोन्याच्या २ अंगठया ३) सोन्याचे गळयातील पदक वजन ३ ग्रॅम, ४) सोन्याची नथ २ ग्रॅम, असा एकुण ५१,०००/—रु.चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन खुल्या दारातुन आत प्रवेश करुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाधव पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन विवाहीतेचा पैश्यासाठी शारिरीक व मानसिक त्रास दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २७/०४/२०१७ चे आज पावेतो. यातील आरोपी यांनी संगनमत करुन फिर्यादीला तु लग्नात हुंडा आणला नाही, आपले वडलांचे घरुन ५ लाख रुपये आण! असे बोलुन फिर्यादीने पैसे आनण्यास मनाई केल्याने लग्नाचे ३ दिवसानंतर पासुन शारिरिक व मानसिक त्रास दिल्याने फिर्यादीचे लेखी तक्रारी वरुन महिला समुपदेशन केन्द्र तुमसर यांचे चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४९८(अ),३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मेसरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) सार्वजनीक मालमत्तेची नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०१/२०१७ चे ०४.०० वाजता. दरम्यान यातील मोहदुरा ते रोहना रिठी या गावाचे सरहद्दीत पानदान रस्त्यावर सन २०१० ते २०१३ या कालावधीमध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत शेतकऱ्यांना आपले शेतात जाण्याकरीता रस्ता तयार करण्यात आला होता, तो रस्ता आरोपीने आपल्या शेताजवळुन घटना ता वेळी कोणतीही माहिती न देता तोडफोड करुन सार्वजनीक मालमत्तेची नुकसान केल्याने फिर्यादी श्री. रामेश्वर तातोबा लिचडे वय ४२ वर्ष, रा. मोहदुरा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४१,५०६ भादंवि. सहकलम ३ सार्वजनीक संपत्ती प्रतीबंधक कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन मारहान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०१/२०१८ चे ०८.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस म्हटले की सार्वजनिक नळाचे पाणी कांदे व लसनाला दतो याची तक्रार सरपंचाला का केली? असे म्हणुन फिर्यादी सोबत भांडण करुन हाता बुक्यांनी गालावर, नाकावर व तोंडावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी विजेन्द्र भैयालाल बन्सोड वय ५२ वर्ष, रा. गांधी वार्ड देव्हाळी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

५) महिलेस अश्लिल शब्दात बोलल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १५/०१/२०१८ चे १४.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी यास फिर्यादीने दिनांक १२/०१/२०१८ ला शेतातील झाडे तोडण्यास मनाई केल्याने आरोपीचे घरी त्याचे पाहुणे व गावचा सरपंच बसले असतांना फिर्यादीचा नाव घेवुन तिला मोठयाने आवाज जाईल, अश्या अश्लिल शब्दात बोलुन तिचे लज्जेस धोका पोहचविल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ५०९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

६) अवैध दारु/जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक १६/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा,गोबरवाही, जवाहरनगर, कारधा व तुमसर येथे अवैध दारू/ जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारू+ १०० किलो सडवामोहा+ साहित्य किंमती ४५००/–रु. तसेच जुगारातुन किंमती १३०७६/–रु. असा एकुण किंमती १७,५७६/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

(दुपार)

जा.क्र. ३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०१/२०१८

**१) भांडण करुन बंडीच्या उभारीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०१/२०१८ चे १३.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी सौरभ चंद्रभोज राहांगडाले वय २१ वर्ष, रा. सुकळी हा व आरोपी हे नातेवाईक असुन यातील फिर्यादी हा करडी येथुन मित्रासोबत यात्रा पाहण्यास जात असतांना यातील आरोपीने फिर्यादीस तुला व तुझ्या वडीलाला पाहुण घेण्याची धमकी देवुन तोंडातोंडी भांडण करुन बंडीच्या उभारीने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना.सार्वे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन जुण्या वादावरुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन कांऊन्टरचे काच फोडुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०१/२०१८ चे २०.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा विनोद खरकाटे यांचे मोबाईल शॅपी समोरील सार्वजनीक ठिकाणी उभा असतांनी यातील आरोपीतांनी संगनमत करुन जुण्या भांडणाचे कारणा वरुन फिर्यादीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन आरोपी क्र. २ ने फिर्यादीचा हात पकडुन विनोद खरकाटे यांचे मोबाईल शॉपी चे काउंन्टरवर लोटले त्यामुळे कांउन्टरचे काच फुटुन अंदाजे १५,००/–रु. चे नुकसान केल्याने व फिर्यादीचे हाताला खरचटल्याचे जखमा झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,३२३,४२७,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना.चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) मोटार सायकलच्या धडकेत चार जखमी . :–**

दिनांक १६/०१/२०१८ चे १८.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे साईडला जावुन त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन ०९५५ च्या हॅन्डलला धडक दिल्याने फिर्यादी व संजय शिवनकर, जयपाल उपरीकर व स्वत: आरोपी चालक हा जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी दिलीप भाऊराव मेश्राम वय ४२ वर्ष, रा. मालदा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४,१८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

४) रेल्वने कटुन इसमाचा मृत्यु  .  :–

दिनांक १६/०१/२०१८ चे २३.५० वाजता. दरम्यान यातील पॅसेजंर रेल्वे गाडी क्र. ५८८१८ ही गोबरवाही कडुन तुमसर कडे येत असतांनी यातील एक अनोळखी इसम वय अंदाजे ६० ते ६५ वर्ष, यास धडक देवुन जागीच मरण पावल्याने फिर्यादी सरतर्फे फिर्यादी कुंभरे याचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १६/०१/२०१८ चे २०.०२ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने महीन्द्रा मॅक्स गाडी च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन अडयाळ बस स्थानक येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरकर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १६/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी – ०७ तीन सिटर वाहनांवरती– १४ केसेस व ईतर वाहनांवरती –११० केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.